लोकमत

# प्रियंकाची जर्मनीतील समर स्कूल प्रोग्रामसाठी निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागांतर्गत सुरू असलेल्या वैद्यकीय माहिती व्यवस्थापन या विषयामध्ये एम.एस्सी. द्वितीय वर्षात शिकणारी विद्यार्थिनी प्रियंका उल्हास पवार हिची जर्मनी येथील होशुल हॅनोवर युनिर्व्हसिटी ऑफ अप्लाइड सायन्स अँड आर्टस् येथे सुरू असलेल्या इंटरनॅशनल समर स्कूल प्रोग्राम फॉर क्लिनिकल रिसर्चसाठी निवड झाली. तेथे क्लिनिकल रिसर्च क्षेत्रातील प्रशिक्षण आणि त्यामधील आंतरराष्ट्रीय स्थरावरील विविध संधी याबाबतचे प्रशिक्षण मिळणार आहे. या निवडीबद्दल प्रियंका हिचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. कैलास सोनवणे, अधिविभागप्रमुख डॉ. पद्मा दांडगे, डॉ. नवनाथ कुंभार यांनी अभिनंदन केले.

पुण्यनगरी



# जर्मनीतील हॅनोवर विद्यापीठामध्ये समर प्रोग्रामसाठी प्रियंकाची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थिनी प्रियंका उल्हास पवार हिची जर्मनी येथील होशुल हॅनोवर युनर्व्हिसिटी ऑफ अप्लाईड सायन्स अँड आर्टस् येथे होणाऱ्या इंटरनॅशनल समर स्कूल प्रोग्राम फॉर क्लिनिकल रिसर्चसाठी निवड झाली आहे. ती जीवरसायनशास्त्र अधिविभागांतर्गत सुरू असलेल्या वैद्यकीय माहिती व्यवस्थापन या विषयामध्ये एम.एस्सी. द्वितीय वर्षात शिकत आहे.

प्रियंका पवारला जर्मनीमध्ये क्लिनिकल रिसर्च क्षेत्रातील प्रशिक्षण आणि त्यामधील आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध संधी याबाबतचे प्रशिक्षण मिळणार आहे. यासाठी जर्मनीमधील प्राध्यापक कॉर्नेलिया फ्रॉम्के यांच्यासह इतर तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

वैद्यकीय माहिती व्यवस्थापन हा कोर्स जीवरसायनशास्त्र अधिविभागामध्ये जून २०१९ पासून सुरू असून, या कोर्ससाठी सर्व सायन्स, मेडिकल व फार्मसी विषयाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या निवडीबद्दल प्रियंका पवार हिचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, समन्वयक डॉ. कैलास सोनवणे, अधिविभागप्रमुख डॉ. पद्मा दांडगे, डॉ. नवनाथ कुंभार यांनी अभिनंदन केले.

23 MAY 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशोशिखर गाठणाऱ्या हॉटेल व्यावसायिक, भूमिपुत्रांचा 'सकाळ गौरवगाथा-२०२५' या कॉफीटेबल बुकच्या प्रकाशन कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि अभिनेता विकास पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी निखिल पंडितराव, यतीश शहा उपस्थित होते.
(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# संकटांतून यश गाठणाऱ्यांची 'गौरवगाथा' प्रेरणादायी

## कुलगुरू डॉ. शिर्के : हॉटेल व्यावसायिकांसह भूमिपुत्रांचा सन्मान; दिमाखदार सोहळ्यात 'सकाळ'तर्फे कॉफीटेबल बुकचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २२ : चंद्र-सूर्य सर्वांना दिसतात. तारे मात्र पाहावे लागतात. अनेक संकटांवर मात करत यशोशिखर गाठणाऱ्या विविध क्षेत्रांतील ताऱ्यांना शोधून त्यांची 'गौरवगाथा' समाजासमोर मांडण्याचा 'सकाळ'चा उपक्रम अभिनव आहे. आपल्या व्यवसाय, उद्योग, कार्याच्या माध्यमातून एकप्रकारे राष्ट्रसेवा करणाऱ्यांची ही 'गौरवगाथा' नव्या पिढीला प्रेरणादायी ठरणारी असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.**

येथील हॉटेल सयाजीमध्ये दिमाखदार सोहळ्यात 'सकाळ गौरवगाथा-२०२५' या कॉफीटेबल बुकचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के आणि अभिनेता विकास पाटील यांच्या हस्ते झाले. हॉटेल, व्यापार, उद्योग, शिक्षण, पर्यटन, ऊर्जा, बांधकाम, करमणूक, समाजसेवा आदी विविध क्षेत्रांतील यशोलौकिकाच्या शिलेदारांसमवेत कुटुंबीयांच्या साक्षीने झालेल्या सन्मानाने हॉटेल व्यावसायिक आणि भूमिपुत्र भारावून गेले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "या 'गौरवगाथा'च्या माध्यमातून सन्मान झालेल्या मान्यवरांनी अथक परिश्रम, सचोटी, प्रामाणिकपणा, दूरदृष्टी, तांत्रिक ज्ञानाचा मिलाफ घडवून आपापल्या क्षेत्रात यश मिळविले आहे. आपला व्यवसाय, उद्योग, कामाच्या माध्यमातून राष्ट्रीय उत्पन्नात भर घालण्यासह रोजगारनिर्मिती, आर्थिक चालना देत आपली 'पॅशन' आणि सामाजिक बांधिलकी जपली आहे. आपण ज्यावेळी यशाचे शिखर गाठतो, त्यावेळी जग पाहत असते; पण त्यामागील कष्ट आणि संकटांचा धैर्याने केलेला सामना दिसत नाही. ते कष्ट समाजासमोर गौरवगाथेच्या माध्यमातून मांडण्याचे महत्त्वपूर्ण काम 'सकाळ'ने केले आहे."



अभिनेते श्री. पाटील म्हणाले, "ठरविले तर आपण काहीही करू शकतो, याबाबतची प्रेरणा 'सकाळ गौरवगाथा'मधील सर्वांच्या जीवनप्रवासातून मिळते. यश मिळविणाऱ्यांना सन्मान करण्याचा 'सकाळ'चा उपक्रम खूप चांगला आहे. आयुष्यात यशस्वी वाटचाल करत पुढे जाताना सामाजिक बांधिलकीही प्रत्येकाने जपली पाहिजे." कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि बेळगाव जिल्ह्यातील हॉटेल व्यावसायिकांसह भूमिपुत्रांचा सन्मान करण्यात आला. 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, 'सकाळ'ने बातम्यांच्या पलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे. विधायक, चांगले काम करणाऱ्यांना 'सकाळ' नेहमी पाठबळ देते. 'गौरवगाथा' हा त्यातील एक उपक्रम आहे. ही 'गौरवगाथा' भावी पिढीला निश्चितपणे स्फूर्तिदायक, मार्गदर्शक ठरणार आहे." 'सकाळ'चे सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा यांनी आभार मानले.

### कॉफीटेबल बुकचे मानकरी

- उत्तम शेखर (शिवतीर्थ ग्रुप), नम्रता कुंभोजकर (ट्रेडनेट वेल्थ), तुषार शेळके (मोटोहाउस), धीरज जैन (ड्रीमडिझाइन), दीपक चौगुले (बगीमहा पॉलिकेम), मोहन चव्हाण (प्रथमेश ट्रॅव्हल्स), महेश जाधव आणि अभय जाधव (एम. जे. एलईडी वॉल), प्रार्थना शहा (रौनक शहा फाउंडेशन), रामकृष्ण वाघिरे (जेआरडी सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस), राहुल कदम आणि दीपक कदम (माऊली केअर सेंटर), एम. पी. पाटील, सदाशिव पाटील, डॉ. संदीप पाटील (भूमिपुत्र), संजय महाजन (स्कायलार्क सर्व्हिसेस), महेश चव्हाण आणि सागर चव्हाण (हॉटेल नंदन), हिरकांत पाटील (एच. पी. ग्रुप), नितीन टक्केकर (हॉटेल रॉयल पॅव्हेलियन) यांचा सन्मान करण्यात आला.

### असाही योगायोग...

- 'सकाळ एकांकिका करंडक'स्पर्धेमध्ये मला अभिनयातील पहिले पारितोषिक मिळाले होते. त्यानंतर या क्षेत्रातील माझी कारकीर्द यशस्वी होत गेली. आज माझ्या मातीतील हॉटेल व्यावसायिक, भूमिपुत्रांच्या सन्मानाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित राहता आले, हा महत्त्वाचा योगायोग आहे, असे अभिनेते श्री. पाटील यांनी सांगताच उपस्थितांनी त्याला टाळ्यांच्या गजरात दाद दिली.